साप्ताहिक

"एकच ध्येय... एकच आवाज"

PRGI No. MAHMAR / 25 / A5304
पोस्ट परवाना नं. : DHL/642/2026-28

# प्रजा न्याय

संपादक – संजय अण्णा कुसळकर

Mob. : 9422798093 / 9028136953
Email - kusalkars@gmail.com
prajanyay@gmail.com

वर्ष-१ले | अंक २७ वा | सोमवार, दि. २०/०७/२०२६ ते दि. २६/०७/२०२६ | पाने ४ | किंमत ३ रुपये

# मुख्यमंत्री जनआरोग्य शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद; हजारो रुग्णांची तपासणी











धुळे – मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या २२ जुलै रोजी होणाऱ्या वाढदिवसानिमित्त मुख्यमंत्री सचिवालयांतर्गत मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, मंत्रालय, मुंबई यांच्या समन्वयाने राज्यभर राबविण्यात येत असलेल्या मुख्यमंत्री जनआरोग्य शिबिर अभियानांतर्गत धुळे शहरातील कानुश्री मंगल कार्यालय, नदीकिनारी, जुने धुळे येथे भव्य मोफत आरोग्य शिबिर उत्साहात व यशस्वीरीत्या पार पडले. सार्वजनिक आरोग्य विभाग, मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, धुळे महानगरपालिका,आमदार श्री अनुप भैय्या अग्रवाल यांचे ए.बी. फाऊंडेशन, सर्वोपचार रुग्णालय, धुळे तसेच आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना , महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना आणि जिल्ह्यातील अंगीकृत खाजगी रुग्णालयांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी मा. आमदार श्री. अनुप अग्रवाल यांच्या हस्ते दिव्यांग लाभार्थ्यांना विशेष सायकलींचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी त्यांनी गरजू रुग्णांना अधिक जलद, सुलभ व गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहण्याची ग्वाही दिली. तसेच शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी योगदान देणाऱ्या सर्व वैद्यकीय अधिकारी, डॉक्टर, आरोग्य कर्मचारी, स्वयंसेवक व समन्वयकांचे विशेष अभिनंदन करून त्यांचे आभार मानले.

शिबिरामध्ये हजारो नागरिकांची विविध तज्ज्ञ डॉक्टरांकडून आरोग्य तपासणी करण्यात आली. हृदयरोग, कर्करोग, अस्थिरोग, नेत्ररोग, स्त्रीरोग, बालरोग, न्यूरोसर्जरी, प्लास्टिक सर्जरी, ईएनटी, त्वचारोग, गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी, फुफ्फुसरोग, रक्तविकार तसेच सामान्य औषधोपचार व शस्त्रक्रिया आदी विविध विभागांतील तज्ज्ञ डॉक्टरांनी रुग्णांची तपासणी करून आवश्यक उपचार व मार्गदर्शन केले. शिबिरामध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने विविध रक्त तपासण्या करण्यात आल्या. गंभीर अथवा जटिल आजारांचे निदान झालेल्या रुग्णांना पुढील उपचारासाठी स्थानिक तसेच उच्चस्तरीय विशेष रुग्णालयांमध्ये रेफर करण्यात येणार असून, त्यांचा उपचार पूर्ण होईपर्यंत आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना, महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामार्फत आवश्यक समन्वय व सहाय्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

रक्तदान शिबिर, नेत्र तपासणी, मोफत चष्मा वाटप, विविध आरोग्य सल्ला सेवा, आवश्यक रक्त तपासण्या तसेच गरजेनुसार शस्त्रक्रियांसाठी पात्र रुग्णांची नोंदणी करण्यात आली. पात्र लाभार्थ्यांना शासनाच्या विविध आरोग्य योजनांचा लाभ मिळावा यासाठी विशेष समुपदेशन करण्यात आले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी श्री. कमलेश देवरे (अध्यक्ष, ए.बी. फाऊंडेशन), डॉ. योगेश पाटील (कक्ष वैद्यकीय अधिकारी, मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष), डॉ. विवेक सावके (जिल्हा समन्वयक, आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना, धुळे), श्री. समीर खान (जिल्हा प्रमुख), श्री. सुभाष मोरे व श्री. योगेंद्र चौधरी (जिल्हा पर्यवेक्षक) यांनी प्रभावी समन्वय साधला. तसेच आरोग्यमित्र श्री. सागर महाजन, आरोग्यमित्र, आशा सेविका व आरोग्य कर्मचाऱ्यांनी आयुष्मान भारत ई–केवायसी व वय वंदना अभियानांतर्गत लाभार्थ्यांची मोठ्या प्रमाणावर नोंदणी करून योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी विशेष योगदान दिले. याशिवाय सर्वोपचार रुग्णालय, धुळे येथील वैद्यकीय अधिकारी, निवासी डॉक्टर, परिचारिका, आरोग्य कर्मचारी, अंगणवाडी सेविका, वैद्यकीय तंत्रज्ञ, औषध निर्माण अधिकारी तसेच अंगीकृत खाजगी रुग्णालयांचे प्रशासकीय अधिकारी व वैद्यकीय समन्वयक यांनी शिबिराच्या यशस्वी आयोजनात मोलाची भूमिका बजावली. यावेळीधुळे शहराचे आमदार श्री अनुप भैय्या अग्रवाल,मा. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. रवींद्र प्रकाश सोनवणे, सर्वोपचार रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अजित पाठक, महापौर सौ. मायादेवी परदेशी, उपमहापौर सौ. ज्योत्स्नाताई पाटील, माजी महापौर श्री. चंद्रकांत सोनार, नगरसेवक श्री. देवा दादा सोनार, धुळे महानगरपालिका आयुक्त श्री. नितीन कापडणीस, मनपा आरोग्य अधिकारी डॉ. संपदा कुलकर्णी, डॉ. धनंजय पाटील, विविध तज्ज्ञ डॉक्टर, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे शिबिर मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, मा. उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे, मा. उपमुख्यमंत्री मा. सुनेत्राताई अजित पवार, मा. सार्वजनिक आरोग्य मंत्री श्री. प्रकाश आबिटकर, मा. पालकमंत्री श्री. जयकुमार रावल, श्री. रामेश्वर नाईक (मुख्यमंत्री सहाय्यता निधी), मा. जिल्हाधिकारी श्रीमती भाग्यश्री वीसपुते तसेच मा. मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. बाबासाहेब बेलदार यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडले. या शिबिराच्या माध्यमातून गरजू नागरिकांना मोफत आरोग्य तपासणी, निदान, उपचार, रक्त तपासण्या, शस्त्रक्रियांसाठी नोंदणी तसेच शासनाच्या विविध आरोग्य योजनांचा लाभ उपलब्ध करून देण्यात आला. जटिल आजारांचे निदान झालेल्या रुग्णांना पुढील उपचारासाठी आवश्यक समन्वय साधून उपचार पूर्ण होईपर्यंत संबंधित यंत्रणा सातत्याने पाठपुरावा करणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

# लोकमान्य बाळ गंगाधर टिळक

लोकमान्य केशव गंगाधर टिळक यांचा जन्म २३ जुलै १८५६ रोजी रत्नागिरी येथे एका मराठी हिंदू चित्पावन ब्राह्मण कुटुंबात झाला, जे सध्याच्या महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्याचे मुख्यालय आहे (तत्कालीन बॉम्बे प्रेसिडेन्सी). ५६ त्यांचे वडिलोपार्जित गाव चिखली होते. त्यांचे वडील गंगाधर टिळक हे शाळेत शिक्षक होते आणि टिळक सोळा वर्षांचे असताना त्यांचे निधन झाले. १८७१ मध्ये, वडिलांच्या मृत्यूच्या काही महिने आधी, सोळा वर्षांचे असताना, टिळकांचा तापीबाई यांच्याशी विवाह झाला. लग्नानंतर त्यांचे नाव बदलून सत्यभामाबाई ठेवण्यात आले. १८७७ मध्ये त्यांनी पुण्याच्या डेक्कन कॉलेजमधून गणित विषयात प्रथम श्रेणीत कला शाखेची पदवी घेतली. एल.एल.बी. कोर्समध्ये शिक्षण घेण्यासाठी त्यांनी एम.ए.चा अभ्यासक्रम अर्धवट सोडला आणि १८७९ मध्ये त्यांनी सरकारी लॉ कॉलेजमधून एलएलबी पदवी प्राप्त केली. ७ पदवी घेतल्यानंतर लोकमान्य टिळकांनी पुण्यातील एका खाजगी शाळेत गणित शिकवायला सुरुवात केली. पुढे नवीन शाळेतील सहकाऱ्यांशी वैचारिक मतभेद झाल्याने त्यांनी माघार घेतली आणि पत्रकार बनले. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक कार्यात सक्रिय सहभाग घेतला. ते म्हणायचे: धर्म आणि व्यावहारिक जीवन वेगळे नाही. केवळ स्वतःसाठी काम न करता देशाला आपले कुटुंब बनवणे हाच खरा आत्मा आहे. पुढची पायरी म्हणजे मानवतेची सेवा करणे आणि त्याही पुढची पायरी म्हणजे देवाची सेवा करणे.

विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या प्रेरणेने, १८८० मध्ये गोपाळ गणेश आगरकर, महादेव बल्लाळ नामजोशी आणि विष्णुशास्त्री चिपळूणकर या त्यांच्या काही महाविद्यालयीन मित्रांसह त्यांनी प्राथमिक माध्यमिक शिक्षणासाठी न्यू इंग्लिश स्कूलची सह-स्थापना केली. भारतातील तरुणांसाठी शिक्षणाचा दर्जा सुधारणे हे त्यांचे ध्येय होते. शाळेच्या यशामुळे त्यांनी १८८४ मध्ये डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून एक नवीन शिक्षण प्रणाली तयार केली ज्याने भारतीय संस्कृतीवर जोर देऊन तरुण भारतीयांना राष्ट्रवादी विचार शिकवले. ९ याच सोसायटीने १८८५ मध्ये माध्यमिकोत्तर व पदवी शिक्षणासाठी फर्ग्युसन कॉलेजची स्थापना केली. टिळक हे फर्ग्युसन कॉलेजमध्ये गणिताचे प्राध्यापक होते.

**विशेष लेख...**

१८९० मध्ये उघडपणे राजकीय कार्य करण्यासाठी टिळकांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटी सोडली. त्यांनी धार्मिक आणि सांस्कृतिक पुनरुज्जीवनावर भर देऊन स्वातंत्र्याच्या दिशेने एक व्यापक चळवळ सुरू केली. लोकमान्य टिळकांनी त्यांच्या प्रदीर्घ राजकीय कारकीर्दीत ब्रिटिश राजवटीपासून भारतीय स्वतंत्रता व स्वायत्ततेसाठी लढा दिला. महात्मा गांधी यांच्या आधी ते सर्वात प्रसिद्ध भारतीय राजकीय नेते होते. त्यांचे समकालीन सहकारी गोपाळ कृष्ण गोखले यांच्या विपरीत टिळक हे प्रखर राष्ट्रवादी परंतु सामाजिक परंपरावादी मानले जात होते. त्यांना अनेक प्रसंगी तुरुंगवास भोगावा लागला. मंडाले येथे ते दीर्घकाळ तुरुंगात होते. त्यांच्या राजकीय जीवनाच्या एका टप्प्यावर ब्रिटिश लेखक सर व्हॅलेंटाइन चिरोल यांनी त्यांना भारतीय अशांततेचे जनक म्हणले होते. टिळक १८९० मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये सामील झाले. त्यांनी विशेषतः स्वराज्याच्या लढ्यासाठी काँग्रेसच्या मवाळ वृत्तीला विरोध केला. तो त्यावेळच्या सर्वात प्रतिष्ठित जहालवादींपैकी एक होते. खरेतर १९०५-१९०७ च्या स्वदेशी चळवळीमुळे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये मवाळवादी आणि जहालवादी अशी विभागणी झाली होती. १८९६ च्या उत्तरार्धात बुबोनिक प्लेगचा प्रसार मुंबई ते पुण्यापर्यंत झाला. जानेवारी १८९७ पर्यंत या रोगाने महामारीचे रूप धारण केले. आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी ब्रिटिश भारतीय सैन्य आणले गेले आणि प्लेगला आळा घालण्यासाठी कठोर उपाय योजले गेले, ज्यात खाजगी घरांमध्ये सक्तीने प्रवेश, घरातील रहिवाशांची तपासणी, रुग्णालये आणि अलग ठेवण्याच्या शिबिरांमध्ये स्थलांतरित करणे, वैयक्तिक वस्तू काढून टाकणे आणि नष्ट करणे समाविष्ट आहे. मालमत्ता, आणि रुग्णांना शहरात प्रवेश करण्यापासून किंवा सोडण्यापासून प्रतिबंधित करणे. मे महिन्याच्या अखेरीस साथीचे रोग नियंत्रणात आले. साथीच्या रोगाला आळा घालण्यासाठी वापरण्यात आलेल्या उपाययोजनांमुळे भारतीय जनतेमध्ये मोठ्या प्रमाणावर नाराजी पसरली. टिळकांनी हिंदू धर्मग्रंथ, भगवद्गीता उद्धृत करून केसरी (केसरी मराठीत लिहिला होता, आणि मराठा इंग्रजीत लिहिला गेला होता) मध्ये प्रक्षोभक लेख प्रकाशित करून हा मुद्दा उचलला, की कोणाला दोष देता येणार नाही. बक्षीसाचा कोणताही विचार न करता अत्याचारी व्यक्तीला मारले. यानंतर, २२ जून १८९७ रोजी, कमिशनर रँड आणि आणखी एक ब्रिटिश अधिकारी, लेफ्टनंट आयर्स्ट यांना चापेकर बंधू आणि त्यांच्या इतर साथीदारांनी गोळ्या घालून ठार केले. (क्रमशः)

## बेकायदेशीर बॅनर्सना धुळे महानगरपालिकेचा दणका; विविध संस्था व क्लासेस विरोधात गुन्हे दाखल

धुळे - महानगरपालिका हद्दीत सार्वजनिक ठिकाणी महानगरपालिकेची पूर्वपरवानगी न घेता अनधिकृतपणे बॅनर्स, फ्लेक्स व जाहिरात फलक लावून सार्वजनिक मालमत्तेचे विद्रूपीकरण करणाऱ्यांविरुद्ध आयुक्त श्री. नितीन कापडणीस यांच्या मार्गदर्शनाखाली धुळे महानगरपालिकेने कठोर कारवाई सुरू केली आहे. या विशेष मोहिमेत अनेक शैक्षणिक संस्था, क्लासेस व व्यावसायिक आस्थापनेविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

शहरातील विविध भागांची तपासणी केली असता दिशा कम्प्युटर, डंबेलकर क्लासेस, पॉसिबल क्लासेस आणि सरस्वती नर्सिंग कॉलेज, देवपूर, तसेच आझादनगर भागातील मुथा बालरुग्णालय, पदमश्री ९, डीसीए कॉमर्स कॉलेज, निर्मल इंग्लीश मेडीयम स्कुल, आदर्श कॅडमी, चौकी ण्ड जेरी, आर्म कॅडमी, शिवसमर्थ क्लासेस, इंग्लीश झोन कॅडमी, लोकमान्य नर्सिंग इन्स्टीटयुट, सिस्टर इन्स्टीटयुट, देवरे क्लासेस, प्रवक्ता क्लासेस, शितल कॅडम, गुरु क्लासेस, किड्झ् चिल्ड्रेन यांच्या नावाचे बेकायदेशीर बॅनर्स व फ्लेक्स आढळून आले. आवश्यक परवानगी घेतलेली नसल्याचे निदर्शनास आल्यानंतर संबंधित जबाबदार व्यक्तींविरुद्ध महाराष्ट्र मालमत्ता विरूपणास प्रतिबंध अधिनियम, १९९५ अंतर्गत देवपूर पोलीस ठाण्यात क्षेत्रीय कार्यालयातील सहाय्यक आयुक्त श्री. राजेंद्र माईनकर, श्री. सागर जकातदार, श्री. किशोर वाघ व श्री किशोर शिंदे त्यांचे टिम व्दारे चाळीसगाव रोड पोलिस स्टेशन, देवपुर पोलिस स्टेशन, आझादनगर पोलिस स्टेशन येथे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. शहरातील सर्व शैक्षणिक संस्था, व्यावसायिक आस्थापना, सामाजिक संस्था, राजकीय पक्ष तसेच नागरिकांना आवाहन केले आहे की, कोणतेही बॅनर, फ्लेक्स किंवा जाहिरात फलक लावण्यापूर्वी महानगरपालिकेची विहित परवानगी घेणे बंधनकारक आहे. परवानगीशिवाय लावण्यात आलेल्या जाहिराती आढळल्यास संबंधितांविरुद्ध कोणतीही पूर्वसूचना न देता कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

शहराचे सौंदर्य, स्वच्छता आणि सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने ही मोहीम सातत्याने सुरू राहणार असून, बेकायदेशीर जाहिरातींना कोणतीही मुभा दिली जाणार नाही. शहर सौंदर्यीकरणाच्या व्यापक मोहिमेत नागरीकांनी सहकार्य करावे असे आवाहन धुळे महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेले आहे.

## शिंदखेडा येथे २२ जुलै रोजी 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर'

धुळे (जिमाका) - तालुका प्रशासन, शिंदखेडा यांच्या वतीने बुधवार, दि. २२ जुलै २०२६ रोजी बिजासनी मंगल कार्यालय, शिंदखेडा,येथे सकाळी ११ वाजता राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या प्रमुख उपस्थितीत 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती तहसीलदार नितीनकुमार देवरे यांनी दिली. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान' अंतर्गत या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

हे शिबिर शिंदखेडा मतदारसंघासाठी आयोजित करण्यात आले असून महसूल, ग्रामविकास, नगरविकास, आरोग्य, पशुसंवर्धन, महावितरण, कृषी, शिक्षण आदी विविध विभागांच्या माध्यमातून सुमारे साडेचार हजार लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ वितरित करण्यात येणार आहे.

या शिबिरास उपजिल्हाधिकारी महादेव खेडकर, प्रांताधिकारी (शिरपूर) शरद मंडलिक, दोंडाईचा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नारायण पाटील, शिंदखेडा नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा श्रीमती कलावती माळी, तसेच कर्ले ग्रामपंचायतीच्या सरपंच श्रीमती सीमा दिनेश ठाकरे उपस्थित राहणार आहेत. या शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार नितीनकुमार देवरे यांनी केले आहे.

## अभ्युदय शिक्षणातील उत्कृष्टतेचे दशक पुरस्कार वितरण सोहळा धुळे एस.व्ही.के.एम. सीबीएसई स्कूल मध्ये उत्साहात

धुळे - धुळे येथील एस.व्ही.के.एम. सीबीएसई स्कूल.मध्ये अभ्युदय : शिक्षणातील उत्कृष्टतेचे दशक या संकल्पनेवर आधारित विद्यार्थी पुरस्कार वितरण समारंभ २०२५-२६ पिनॅकल मोठ्या उत्साहात आयओटी सभागृहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका सौ. सुनंदा मेनन होत्या. प्रमुख पाहुण्या म्हणून श्रीमती स्वरांजली पिंगळे (मुख्य वित्त व लेखाधिकारी, जिल्हा परिषद, धुळे), उपमुख्याध्यापिका सौ. पिंकी साहा व मान्यवर उपस्थित होते. सर्व मान्यवर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. शाळेच्या गायकवृंदाने सादर केलेल्या प्रार्थनागीताने वातावरण भक्तिमय झाले.

मुख्याध्यापिका सौ. सुनंदा मेनन यांनी शाळेच्या दहा वर्षांच्या यशस्वी शैक्षणिक प्रवासाचा आढावा घेत विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल गौरवोद्गार काढले. कार्यक्रमात इयत्ता दहावी व बारावीच्या बोर्ड परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. इयत्ता बारावी विज्ञान शाखेतील साची किर्तेश अग्रवाल हिने जेईई ड्वान्स्ड मध्ये अखिल भारतीय क्रमांक ३०,०३६ मिळवत बारावीत ९३.८० टक्के गुण प्राप्त केले. दक्ष कुणाल मेहता याने आयआयएसईआर, जेईई मेन्स, एमएच सीईटी, एनईएसटी, नीट, सीयूईटी या विविध राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश मिळवून शाळेचा गौरव वाढविला. निवेधा आलोक अग्रवाल हिने चार विषयांत अव्वल येत पहिल्याच प्रयत्नात सीए फाउंडेशन परीक्षा उत्तीर्ण केली, तर प्रतीक पाटील याने वाणिज्य शाखेत ९०.६ टक्के गुण मिळविले.

इयत्ता दहावीमध्ये अमित अग्रवाल याने ९६.८० टक्के गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. जल पडालिया आणि इतर गुणवंत विद्यार्थ्यांचाही यावेळी गौरव करण्यात आला.याशिवाय इयत्ता पहिली ते अकरावीतील सर्वसाधारण प्रावीण्य (जनरल प्रोफिसीन्सी) प्राप्त विद्यार्थी, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये १०० टक्के उपस्थिती राखणारे विद्यार्थी तसेच नव्याने निवडून आलेल्या पीटीए सदस्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमात शाळेच्या विद्यार्थ्यांनी शाळेच्या दशकभराच्या यशस्वी प्रवासावर आधारित समूहगीत सादर केले. तसेच अर्धशास्त्रीय नृत्याने उपस्थितांची मने जिंकली. आभार प्रदर्शन व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.या सोहळ्याद्वारे विद्यार्थ्यांच्या परिश्रम, शिस्त, सातत्य आणि शैक्षणिक उत्कृष्टतेचा गौरव करत एसव्हीकेएम स्कूलने शिक्षण क्षेत्रातील आपल्या दहा वर्षांच्या यशस्वी वाटचालीचा अभिमानाने उत्सव साजरा केला.

मुख्याध्यापिका सौ. सुनंदा मेनन व उपमुख्याध्यापिका सौ. पिंकी साहा यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाच्या प्रभारी शिक्षिका सौ. रूबी नायर यांनी नियोजन व समन्वयाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. एस.व्ही.के.एम. संस्थेचे अध्यक्ष तथा माजी मंत्री आमदार अमरीशभाई पटेल, सह-अध्यक्ष भूपेशभाई पटेल, उपाध्यक्ष चिंतनभाई पटेल, ग्लोबल युनिव्हर्सिटी प्रेसिडेंट सौ. स्नेहा पारीख, व्यवस्थापन समिती सदस्य राजगोपाल भंडारी, धुळे कॅम्पस चेअरमन संजय अग्रवाल, स्कूल संचालिका गिरीजा मोहन, उपसंचालिका पियाली कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# बुराई नदीकाठच्या पूरग्रस्त वस्त्यांना दिलासा; अडीच कोटींच्या विकासकामांचा शुभारंभ

## नदीचे मूळ स्वरूप जपत संरक्षण भिंत उभारणार–पालकमंत्री जयकुमार रावल यांचे निर्देश

धुळे (जिमाका) – शिंदखेडा शहरातील बुराई नदीलगतच्या नवापुल ते विहीर (रज्जाक नगर) परिसरातील पूरग्रस्त नागरिकांना दिलासा देण्यासाठी राज्य आपत्ती सौम्यीकरण योजनेअंतर्गत उभारण्यात येणाऱ्या १.५० कोटी रुपयांच्या संरक्षण भिंतीचे तसेच शहरातील सुमारे १ कोटी रुपयांच्या सोलर स्ट्रीट लाईटचे भूमिपूजन राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला शिंदखेडा नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष उदय देसले, सार्वजनिक बांधकाम सभापती मनोहर पाटील, स्वच्छता व आरोग्य सभापती श्रीमती संगीता भिल, पाणीपुरवठा सभापती श्रीमती पुनम मराठे, महिला व बालकल्याण सभापती श्रीमती आरेफाबी अबुतालीब कुरेशी, गटनेते अनिल वानखेडे, नगरसेवक यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पालकमंत्री श्री. रावल म्हणाले की, बुराई नदी ही शहराची नैसर्गिक संपत्ती असून तिचे संरक्षण करतानाच नदीचे मूळ स्वरुप जपणे आवश्यक. आहे. संरक्षण भिंत परिसरात आणि नदीपात्रात अतिक्रमण करू नये. अन्यथा भविष्यात महापुरात भिंतीलाही धोका निर्माण होऊ शकतो. बुराई नदी बारमाही प्रवाही करण्यासाठीही विविध उपाययोजनांवर काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. पावसाळ्यात पुराचे पाणी घरांमध्ये शिरत असल्याने संरक्षण भिंत या भागासाठी दिलासादायक ठरणार आहे. नदीकाठाचा परिसर विकसित झाल्यास तो पर्यटन आणि नागरिकांच्या फिरण्यासाठी आकर्षणाचे केंद्र बनेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

यावेळी परिसरात बसविण्यात येणाऱ्या सोलर स्ट्रीट लाईटची काळजी घेण्याचे आवाहन करताना



सार्वजनिक मालमत्तेची चोरी किंवा नुकसान होणार नाही, यासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा, डीपीडीसी निधीतून यापूर्वी सोलर लाईट, सार्वजनिक शौचालय, ज्येष्ठ नागरिकांसाठी सामाजिक सभागृह, पेव्हर ब्लॉक आदी विविध विकासकामे करण्यात आली असून आगामी काळातही विकासासाठी निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे त्यांनी सांगितले. प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रवीण माळी यांनी केले.

## मध केंद्र योजनेसाठी अर्ज सादर करावेत जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी राजेश गवांदे

धुळे (जिमाका) – महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत सन २०२६–२०२७ करिता मधकेंद्र योजनेसाठी पात्र व्यक्ती आणि संस्थानी अर्ज सादर करावे, असे आवाहन जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी राजेश गवांदे यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे. मधमाशी पालनाचे फायदे – मध आणि मेणाची विक्री करुन उत्तन आर्थिक उत्पन्न मिळते. मधमाशा परागीकरणामुळे पिकाचे उत्पादन ३० ते ४० टक्क्यांनी वाढते. रॉयल जेली, प्रोपोलिस आणि मधमाशांचे विष या मौल्यवान उत्पादनांची विक्रीकरुन उद्योग निर्मिती करतात येते. शेतीसोबत पूरक व्यवसाय सहज करता येतो. मधकेंद्र योजना सुरु करण्यासाठी लाभार्थ्यांना प्रशिक्षण, मधमाशा पालन व्यवसायासाठी आवश्यक्य साहित्य, मधपेट्या, मधमाशी वसाहत आणि मधयंत्रांचा पुरवठा केला जातो. या व्यवसायासाठी पात्र लाभार्थ्यांना ५० टक्के अनुदान स्वरुपात देण्यात येईल व ५० टक्के स्वगुंतवणूक करावी लागेल. प्रशिक्षण आणि जनजागृती – मध उद्योगाच्या प्रसिद्धीसाठी तालुकास्तरावर १ दिवसाचे जनजागृती शिबिरे आयोजित केली जातात. ज्यामध्ये प्रत्येक मेळाव्यात ५० शेतकरी / मधपाल सहभागी होऊ शकतात. मधपाळांना १० दिवसांचे निवासी प्रशिक्षण दिले जाते.राहण्याची व जेवणाची सोय मंडळातर्फे विनामूल्य केली जाते. प्रशिक्षण हे ५० टक्के स्वत: गुंतवणूक रक्कम कार्यालयाकडे जमा केल्यानंतर सुरु करण्यात येते. प्रगतीशिल मधपाळ किंवा संस्थेच्या सदस्यांना महाबळेश्वर येथील मध संचालनालयात २० दिवसांचे निवासी प्रशिक्षण दिले जाईल. राहण्याची व जेवण्याची सोय मंडळामार्फत विनामूल्य केली जाईल. प्रशिक्षण हे ५० टक्के स्व: गुंतवणूक रक्कम कार्यालयाकडे जमा केल्यानंतर सुरु करण्यात येईल. पात्रता – वैयक्तिक मधपाळ :– अर्जदार साक्षर असावा, अर्जदाराचे वय १८ वर्षापेक्षा जास्त असावे आणि स्वत:ची शेती असल्यास प्राधान्य दिले जाईल. तसेच मान्यता प्राप्त केंद्रात १० दिवसांचे प्रशिक्षण पूर्ण करणे अनिवार्य आहे.

प्रगतीशील मधपाळ : वय २१ वर्षांपेक्षा जास्त, किमान दहावी उत्तीर्ण आणि स्वत:च्या किंवा कुटूंबाच्या नावे किमान एक एकर शेतजमीन (मालकीची किंवा भाडेतत्वावर) असणे आवश्यक आहे.त्यांच्याकडे प्रशिक्षण देण्याची सुविधा असावी. संस्था : संस्था नोंदणीकृत असावी, किमान १ एकर शेतजमीन असावी आणि प्रशिक्षण केंद्रासाठी किमान ५०० चौ.क्षेत्राची सुयोग्य इमारत असावी.

आवश्यक कागदपत्रे :– आधारकार्ड, शैक्षणिक पात्रतेचा दाखला, ७/१२ उतारा आणि ८–अ उतारा, बँक पासबुक छायांकित प्रत, पासपोर्ट आकाराचे फोटो, विहित नमून्यातील अर्ज. अर्जासाठी व योजनेच्या अधिक माहितीसाठी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,धुळे द्वारा जिल्हा उद्योग केंद्र, जमनागिरी रोड,धुळे दूरध्वनी क्रमांक ०२५६२– २४६२९२ येथे किंवा मध प्रशिक्षण कर्मचारी करमसिंग वसावे (मधुक्षेत्रिक) ९४२१२३६८८४ राजेश गवांदे (जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी) (९९२२३५१४२३ ) यांच्याशी संपर्क साधावा.

## आर. सी. पटेल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा विद्यार्थी तन्मय मराठे याची राष्ट्रीय झेप; भारत सरकारकडून कृषी प्रकल्पाच्या डिझाईन पेटंटला अधिकृत मान्यता

शिरपूर – शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचालित आर. सी. पटेल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता १२ वी विज्ञान शाखेचा विद्यार्थी तन्मय अंकुश मराठे याने विकसित केलेल्या सौरऊर्जेवर चालणाऱ्या रिमोट नियंत्रित कृषी फवारणी यंत्र या अभिनव कृषी प्रकल्पाला भारत सरकारकडून डिझाईन पेटंट प्राप्त झाले आहे. विशेष म्हणजे, विद्यालयातील प्रथमच एखाद्या विद्यार्थ्याच्या प्रकल्पाला भारत सरकारकडून डिझाईन पेटंट प्राप्त झाल्याने ही कामगिरी संस्था, शाळा व शिरपूर शहरासाठी अभिमानाची ठरली आहे. भारतीय शेतीमध्ये आजही कीटकनाशके व द्रवरूप खतांची फवारणी करताना शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. फवारणीदरम्यान विषारी रसायनांचा थेट संपर्क झाल्यामुळे श्वसनाचे विकार, त्वचारोग, डोळ्यांचे त्रास तसेच पाठीच्या कण्यावरील ताण यांसारख्या गंभीर आरोग्य समस्या निर्माण होतात. याच समस्येचा सखोल अभ्यास करून तन्मय मराठे यांनी शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देणारे सौरऊर्जेवर चालणारे, रिमोट नियंत्रित कृषी फवारणी यंत्र विकसित केले आहे. या यंत्रामध्ये सौरऊर्जेच्या सहाय्याने बॅटरी चार्ज केली जाते. त्यानंतर रिमोट नियंत्रकाच्या माध्यमातून शेतकरी सुरक्षित अंतरावरून संपूर्ण यंत्र नियंत्रित करून शेतात फवारणी करू शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांचा



विषारी कीटकनाशकांशी होणारा थेट संपर्क कमी होतो, मानवी श्रम व वेळेची बचत होते, उत्पादनक्षमता वाढते आणि शेती अधिक सुरक्षित, आधुनिक व पर्यावरणपूरक बनण्यास मदत होते. कमी खर्चात अधिक सुरक्षित, परिणामकारक व शाश्वत तंत्रज्ञान ग्रामीण भागातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. या प्रकल्पाच्या निर्मितीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचाही प्रभावी वापर करण्यात आला आहे. प्रकल्पाची संकल्पना अधिक सक्षम करण्यासाठी, विविध रचनांचे विश्लेषण करण्यासाठी, आवश्यक तांत्रिक सुधारणा करण्यासाठी तसेच कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी एआय चा वापर करण्यात आला. त्यानंतर प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या गरजा, ग्रामीण भागातील परिस्थिती, वापरण्याची सुलभता, कमी खर्च, टिकाऊपणा आणि कार्यक्षमतेचा विचार करून प्रकल्पामध्ये अनेक सुधारणा करण्यात आल्या. परिणामी, हा प्रकल्प अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित असला तरी ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना सहज समजेल, वापरता येईल आणि त्यांच्या दैनंदिन शेतीमध्ये प्रत्यक्ष उपयोगी पडेल, अशा स्वरूपात विकसित करण्यात आला आहे.

या अभिनव प्रकल्पाची दखल राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर घेण्यात आली आहे. नीती आयोग, भारत सरकार आयोजित अटल मॅरेथॉन या प्रतिष्ठित राष्ट्रीय नवोपक्रम स्पर्धेत देशभरातील हजारो प्रकल्पांमधून या प्रकल्पाची अव्वल १५० मध्ये निवड झाली होती. तसेच विविध राष्ट्रीय हॅकेथॉन, यंग सायंटिस्ट इंडिया तसेच आंतरराष्ट्रीय आविष्कार स्पर्धा यांसारख्या प्रतिष्ठित व्यासपीठांवरही या प्रकल्पाची निवड होऊन त्याचे सादरीकरण करण्यात आले आहे. कृषी क्षेत्रातील नाविन्यपूर्ण, समाजोपयोगी आणि शाश्वत तंत्रज्ञान म्हणून या प्रकल्पाला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर विशेष दाद मिळाली आहे.

भारत सरकारकडून प्राप्त झालेल्या डिझाईन पेटंटमुळे या प्रकल्पाच्या बाह्य रचनेला कायदेशीर संरक्षण प्राप्त झाले आहे. त्यामुळे या रचनेची अनधिकृत नक्कल अथवा व्यावसायिक वापर रोखण्यासाठी कायदेशीर अधिकार प्राप्त झाले असून भविष्यात उद्योगांशी तंत्रज्ञान हस्तांतरण, नवउद्योग उभारणी, उत्पादनाचे व्यावसायिकीकरण आणि भारतीय शेतीसाठी नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान विकसित करण्याच्या दृष्टीने हा महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे. विद्यार्थी दशेतच संशोधन, नवोपक्रम आणि बौद्धिक संपदा क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करत तन्मय मराठे यांनी शिरपूरचे नाव राष्ट्रीय स्तरावर पोहोचविले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी देखील संशोधन, तंत्रज्ञान आणि नवकल्पनांच्या बळावर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली ओळख निर्माण करू शकतात, याचे प्रेरणादायी उदाहरण त्यांनी आपल्या कार्यातून दाखवून दिले आहे. तन्मय मराठे यास विज्ञान शिक्षक पी.के.पाटील व के. एस. माहेश्वरी यांचे मार्गदर्शन लाभले. या उल्लेखनीय यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव सौ. रेषा पटेल, सर्व संचालक, सीईओ डॉ.उमेश शर्मा, अॅकॅडमीक इन्चार्ज पी. व्ही. पाटील, प्राचार्य डॉ.एस.एन. पाटील, पर्यवेक्षक वाय.व्ही. कोठावदे यांनी अभिनंदन करून पुढील संशोधन कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# शिंदखेडा शहराच्या विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देणार; शिंदखेडा नगरपंचायत झाल्यानंतर शहर विकासाला मिळाली गती-पालकमंत्री जयकुमार रावल

धुळे (जिमाका) – शिंदखेडा शहरातील नागरिकांना अधिक दर्जेदार नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी तसेच शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात येईल, अशी ग्वाही राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी दिली.

महात्मा ज्योतिबा फुले सभागृह शिंदखेडा नगरपंचायत येथे पालकमंत्री श्री. रावल यांच्या हस्ते शिंदखेडा नगरपंचायतीच्या नविन बोधचिन्ह अनावरण समारंभ संपन्न झाला. यावेळी नगराध्यक्षा श्रीमती कलावती माळी, उपनगराध्यक्ष उदय देसले,तहसिलदार नितीनकुमार देवरे, मुख्याधिकारी श्रीकांत फागणेकर,बांधकाम सभापती मनोहर पाटील, यांच्यासह पदाधिकारी तसेच नगरसेवक उपस्थित होते.



पालकमंत्री श्री.रावल म्हणाले, शिंदखेडा मतदारसंघाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर शहरासमोर पिण्याच्या पाण्याची समस्या, अपुरा निधी, जुन्या इमारती आणि मर्यादित नागरी सुविधा अशा अनेक अडचणी होत्या. शहराचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीत रूपांतर करणे हाच प्रभावी पर्याय असल्याची भूमिका घेत शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा करण्यात आला.

शहराच्या भविष्यातील विकासाबाबत बोलताना त्यांनी शिंदखेड्यासाठी आधुनिक क्रीडा संकुल उभारण्याचा प्रस्ताव अंतिम टप्प्यात असल्याची माहिती दिली. तहसील प्रशासनाच्या सहकार्याने पाच एकर शासकीय जागा निश्चित करण्यात आली असून त्या ठिकाणी सुसज्ज क्रीडा संकुल उभारण्यात येणार आहे. तसेच शहरातील प्रमुख रस्ते, पायाभूत सुविधा आणि नागरी सुविधांच्या विकासासाठीही सातत्याने निधी उपलब्ध करून दिला जाईल, असे त्यांनी सांगितले. पालकमंत्री श्री. रावल यांनी बोधचिन्हाच्या निर्मितीत योगदान देणाऱ्या सर्वांचे अभिनंदन करत हे बोधचिन्ह शिंदखेडा शहराचा इतिहास, संस्कृती आणि प्रगतीचे प्रतीक असल्याचे सांगितले. शहराची स्वतंत्र ओळख अधिक बळकट करण्यासाठी सुसज्ज अशी प्रशासकीय इमारत उभारण्याची आवश्यकता असून त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले. यावेळी नगराध्यक्ष श्रीमती कलावती माळी यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच नगरपंचायतीच्या बोधचिन्ह निर्मितीत योगदान देणाऱ्या मान्यवरांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी मुख्याधिकारी श्री. फागणेकर यांनी प्रास्ताविक केले. अभियंता अमरदीप गिरासे यांनी सूत्रसंचालन केले.

असे आहे बोधचिन्ह – पाटण हद्दीत असलेले परंतु शहराची ओळख असणा-या श्री. आशापुरी माता मंदिराचे प्रतिकात्मक स्वरुप. १२५ वर्षांची उज्वल परंपरा असलेल्या श्री. बालाजी रथाचे प्रतिकात्मक स्वरुप. शहराची जीवनवाहिनी असणा-या बुराई नदीचे प्रतिकात्मक स्वरुप. शहर व परिसरात मोठ्या प्रमाणात उत्पादित होणा-या कापसाच्या पिकाचे प्रतिक म्हणुन कापसाचे बोंड. शहराच्या विकासाचे व प्रगतीचे प्रतिक म्हणून रस्त्याचे प्रतिकात्मक स्वरुप. शहराचा विकास साधतांना सर्वांचेच हित व सुख साधण्यासाठी कटीबध्द असण्याचे प्रतिक म्हणून बहुजन हिताय बहुजन सुखाय हे ब्रिद वाक्य.

# आर. सी. पटेल माध्यमिक विद्यालयात विद्यार्थी सुरक्षा या विषयावर चर्चा करण्यासाठी परिवहन समितीची सभा संपन्न

शिरपूर – शहरातील आर. सी. पटेल माध्यमिक विद्यालयात विद्यार्थी सुरक्षा या विषयावर चर्चा करण्यासाठी परिवहन समितीची सभा आयोजित करण्यात आली. इयत्ता ५ वी ते १२ वी तील तालुक्यातील विविध खेड्यावरील विद्यार्थी काही एस.टी. बस तर काही खाजगी वाहनाने ये – जा करतात. खाजगी वाहनाने प्रवास करणाऱ्या विद्यार्थ्यांची सुरक्षा कशी चांगल्या प्रकारे राखता येईल या विषयावर चर्चा करण्यासाठी विद्यालयात परिवहन समितीची सभा प्राचार्य डॉ. एस. एन. पाटील व पर्यवेक्षक वाय. व्ही. कोठावदे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाली.




या प्रसंगी विद्यार्थ्यांना शाळेत ने –आण करणारे खाजगी वाहन चालक उपस्थित होते. प्राचार्य डॉ. एस. एन. पाटील यांनी खाजगी वाहन चालकांना विद्यार्थी सुरक्षा नियमावलींची ओळख करुन दिली. बैठकीत विद्यार्थ्यांची सुरक्षितता सर्वोच्च असल्याचे अधोरेखित करण्यात आले. वाहनचालकांनी वाहने निर्धारित वेगमर्यादेत चालवावीत, वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे तसेच वाहन चालविताना मोबाईल फोनचा वापर टाळावा. तसेच फर्स्ट एड, सीपीआर, एबीसी तत्त्वे व आपत्कालीन परिस्थितीत करावयाच्या उपाययोजनांची माहिती देण्यात आली. वाहनांची नियमित तपासणी, ब्रेक, टायर, दिवे यांची स्थिती, आर.सी. बुक, फिटनेस प्रमाणपत्र, विमा, पीयूसी आणि वाहनचालकाचा वैध परवाना आदी कागदपत्रे अद्ययावत ठेवण्याच्या सूचना वाहन चालकांना देण्यात आल्या. शाळा, पालक आणि वाहन चालक यांनी परस्पर समन्वय ठेवून विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासाला प्राधान्य द्यावे, असे आवाहन असे आवाहन प्राचार्य डॉ. एस. एन. पाटील यांनी वाहन चालकांना केले. पर्यवेक्षक वाय. व्ही. कोठावदे यांनी शाळेच्या परिसरात वाहतूक नियमांचे पालन करणे, वाहन चालवितांना अतिघाई करू नये, विद्यार्थी सर्व नीट बसले आहेत का ? याची खात्री करणे, गरजेपेक्षा जास्त विद्यार्थी गाडीत न बसविणे, शाळेत विद्यार्थी आणतांना व नेतांना त्यांची गणना करणे, विद्यार्थ्यांना हात किंवा डोके बाहेर काढणार नाहीत याची खबरदारी घेणे, विद्यार्थी वाहतूक लोगो ठळक अक्षरात वाहनावर लावणे, वाहन चालकांनी स्वतःचे पोलीस व्हेरीफिकेशन करणे,तसेच सर्व वाहन चालकांनी आधार कार्ड झेरॉक्स जमा करणे अशा विविध विषयांवर मार्गदर्शन केले. विद्यालयाच्या वतीने सर्व खेड्यावरील विद्यार्थी तसेच विद्यार्थ्यांना ने – आण करणाऱ्या चालकांचे नाव, गाव, गाडी नंबर, मोबाईल नंबर, परवाना अशा आदींची नोंद शालेय रजिस्टरवर करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शालेय परिवहन समिती विभाग प्रमुख एस.पी.चौधरी, पी. एस. पाटील, एस. के. पाटील, पी. व्ही. गव्हाळे यांनी प्रयत्न केले.

# जिल्ह्यात १ ऑगस्टपर्यंत आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिरांचे आयोजन

धुळे (जिमाका) – महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच स्व. अजितदादा पवार यांच्या स्मृतीनिमित्त श्री. भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने १९ जुलै ते १ ऑगस्ट २०२६ या कालावधीत श्री. भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, धुळे येथे जिल्हास्तरीय विविध आरोग्य तपासणी शिबिरे व विशेष रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती सर्वोपचार रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अजित पाठक यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. शिबिराचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे : दि. २२ व २८ जुलै : शरीरविकृतीशास्त्र विभागामार्फत रक्तदान शिबिर. दि. २२ ते २४ जुलै : शल्यचिकित्सा विभागामार्फत स्तन कर्करोग तपासणी व संशयित रुग्णांची बायोप्सी तपासणी. दि. २५ ते २७ जुलै : स्त्रीरोग व प्रसूतिशास्त्र विभागामार्फत गर्भाशय मुख कर्करोग तपासणी शिबिर. दि. २७ जुलै : जनऔषधवैद्यकशास्त्र विभागामार्फत ह्यूमन पॅपिलोमा व्हायरस (एचपीव्ही) संक्रमण व लसीकरण जनजागृती शिबिर. दि. २२ ते २४ जुलै : अस्थिव्यंगोपचारशास्त्र विभागामार्फत ज्येष्ठ नागरिकांसाठी हाडांची व अस्थी ठिसूळता तपासणी. दि. २२ ते २८ जुलै : कान, नाक व घसा विभागामार्फत मुख कर्करोग तपासणी तसेच संशयित रुग्णांची बायोप्सी तपासणी. दि. २२ ते ३१ जुलै : नेत्रशल्यचिकित्सा विभागामार्फत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर. दि. २८ जुलै ते १ ऑगस्ट : औषधवैद्यकशास्त्र विभागामार्फत हृदयरोग, स्थूलता व उच्च रक्तदाब तपासणी तसेच जनजागृती शिबिर. दि. २९ जुलै : जनऔषधवैद्यकशास्त्र विभागामार्फत मधुमेह प्रतिबंध व नियंत्रण शिबिर. दि. ३० जुलै : जनऔषधवैद्यकशास्त्र विभागामार्फत असंसर्गजन्य आजार प्रतिबंध व नियंत्रण शिबिर. दि. १ ऑगस्ट : जनऔषधवैद्यकशास्त्र विभागामार्फत कर्करोग प्रतिबंध व नियंत्रण शिबिर.

या विविध आरोग्य तपासणी व जनजागृती शिबिरांचा जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन सर्वोपचार रुग्णालय, धुळेचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अजित पाठक यांनी केले आहे.

हे मराठी साप्ताहिक, प्रकाशक संजय अण्णा कुसळकर यांनी मुद्रक अब्दुल मलिक मोहम्मद शरीफ अन्सारी यांच्या न्यू शार्प ऑफसेट प्रिंटर्स, अप्सरा हॉटेल, नवीन बस स्टॅण्ड समोर, मालेगांव, जि. नाशिक येथे छापून सा. 'प्रजा न्याय' कार्यालय – घर नं. २६, चक्करबर्डी, शासकीय दूध डेअरी रोड, पाण्याच्या टाकीजवळ, धुळे – ४२४ ००१ येथून प्रकाशित केले आहे. संपादक, मालक, संजय अण्णा कुसळकर – भ्रमणध्वनी – ९४२२७९८०९३ / ९०२८१३६९५३. Email - kusalkars@gmail.com / prajanyay@gmail.com (कायदेशीर सल्लागार – ॲड. उमेश विठ्ठल सुर्यवंशी)
(या वृत्तपत्रातील लिखाणाशी मालक/प्रकाशक/संपादक सहमत असतीलच असे नाही.) (कोणताही वाद धुळे न्यायालयांतर्गत)